|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/६/प्र.पा./पदव्युत्तर प्रवेश /५१/२०२४ दिनांक :- २४ जून,२०२४

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य / मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक, यांना

२) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक / शैक्षणिक विभागाचे मा.विभाग प्रमुख यांना

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता एम.ए. व एम.कॉम. प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत.

**संदर्भ :-** विद्यापीठाचे परिपत्रक क्र.११/२०२४, दिनांक १२/०६/२०२४

**महोदय/महोदया,**

आपणास विदितच आहे की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ प्रशाळा / शैक्षणिक विभागातील एम.एस्सी./ एम.ए.(भूगोल) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन केंद्रिय पध्दतीने विद्यापीठामार्फत राबविण्यात येते. तसेच शै.वर्ष २०१९-२० पासून एम.एस.डब्ल्यु.या पदव्युत्तर अभ्याक्रमाचे प्रवेश विद्यापीठामार्फत सामाईक प्रवेश परीक्षा घेवून (CET) केंद्रिय पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता एम.ए. (भूगोल विषय व्यतिरिक्त सर्व विषय), एम.कॉम., एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) व एम.ए. (डॉ.आंबेडकर थॉट्स) इत्यादी पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविणाऱ्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयानी, विद्यापीठ प्रशाळांनी / शैक्षणिक विभागांनी मागील वर्षाप्रमाणे आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार, या वर्षी ही विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी. सदर प्रवेश प्रक्रिया राबवितांना खाली नमूद केलेल्या बाबी लक्षात घेण्यात याव्यात.

उपरोक्त प्रवेश प्रक्रिया राबवितांना विद्यापीठाने निश्चित केलेल्या नियमांप्रमाणे विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून, शासन निर्णयानुसार पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांची गुणवत्ता यादी जाहीर करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे. गुणवत्ता यादीची एक प्रत महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात यावी. तसेच महाविद्यालयाच्या / विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सदर गुणवत्ता यादी प्रसिध्द करावी व दुसरी प्रत प्रवेश व पात्रता विभाग यांच्याकडे पाठविण्यात यावी. गुणवत्ता यादीवर विद्यार्थ्यांचे काही आक्षेप असल्यास त्यांचे निराकरण करुन प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यात यावी. **प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर पात्रता अर्जासोबत आवश्यक दस्ताऐवज जोडून पात्रता अर्ज आणि परिशिष्ट 'ब' विषय निहाय फाईलमध्ये पात्रता विभागास विहित मुदतीत सादर करावेत.** विहित मुदतीत पात्रता अर्ज विद्यापीठात जमा करण्यास विलंब झाल्यास त्यास संबंधीत महाविद्यालय / विद्यापीठ प्रशाळा जबाबदार राहतील. कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

(कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, 1990, 'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle), जळगाव-४२५००१)

सहा.कुलसचिव,
प्रवेश पात्रता विभाग व अभ्यासमंडळ

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-**

१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगांव.

२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय कबचौ उमवि, जळगांव.

३) मा.संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, कबचौ उमवि, जळगांव.

४) मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, कबचौ उमवि, जळगांव.

☎ :- (९१) ०२५७ - २२५७२१२, २२५७४०८, २२५७२१७, वेबसाईट :- www.nmu.ac.in, ई-मेल :- registrar@nmu.ac.in
फॅक्स क्रं:- (९१) ०२५७- २२५८४०३,४०६ प्रवेश पात्रता विभाग, पत्र पेटी क्रं. ८०, क.ब.चौधरी उमविनगर, जळगांव -४२५००१